| | |
|---|---|
| MHST160009012012 | नि.दि.मु.क्र.३०३/२०१२ मधील नि.१४९ वरील आदेश<br><br>(श्री.राजेंद्र बबन काकडे<br>वि.<br>श्री.उमेश बबन काकडे)<br><br>(पारित दिनांक १२.०७.२०२४) |

वादीने सदरचा अर्ज प्रतिवादी क्र.४ श्रीमती मंगल विजय सावंत या मयत झाल्याने त्यांचे वारस अभिलेखावर घेणेस झालेला विलंब माफीसाठी दाखल केलेला आहे.

२. वादीचे असे म्हणणे आहे की, सदरचा दावा दावा मिळकतीचे सरस निरस मानाने वाटपासाठी दाखल केलेला आहे. सदर दाव्याचे कामी दावा दाखल झालेनंतर दाव्यातील प्रतिवादी क्र.४ श्रीमती मंगल विजय सावंत हया दि.३०.०७.२०२२ रोजी मयत झाल्या आहेत. तथापि सदर प्रतिवादी क्र.४ चे वारस अभिलेखावर घेण्यास सुमारे ११ महिन्यांचा उशीर झालेला आहे.

३. वादीचे पुढील कथन असे की सदरील झालेला उशीर हा वादीने जाणून बुजून केलेला नाही. सदरचा विलंब हा वादी यांना प्रतिवादी क्र.४ मयत असलेबाबतचे रेकॉर्ड लवकर उपलब्ध झाले नसल्या कारणाने वारस अभिलेखावर घेण्यास उशीर झालेला आहे. सदरचा विलंब हा योग्य व संयुक्तीक कारणाने झालेला आहे. तरी सदरचा झालेला उशीर माफ होवून प्रतिवादी क्र.४ चे वारस अभिलेखावर घेण्यास परवानगी मिळावी व झालेला उशीर माफ होवून मिळावा अशी विनंती केली आहे.

४. प्रतिवादी यांचे सदर अर्जावर म्हणणे असे आहे की, सदरचा अर्ज त्यांना मान्य व कबूल नाही. प्रतिवादी नं.४ब यांचे करीता पालनकर्ता या नात्याने नेमणूक करण्याकरीता कायदेशीर तरतुदी प्रमाणे वादी यांनी मे.कोर्टाची परवानगी घेणे आवश्यक व जरूरीचे आहे. या कारणाने वादी यांचा सदरचा अर्ज कायदयाने चालणार नाही. या कारणाने सदरचा अर्ज रद्द होण्यास पात्र आहे. त्यांचे पुढे असे

कथन आहे की, दाव्याचा गुणदोषावर निर्णय होण्यास सदरची दुरूस्ती कशी आवश्यक आहे हे त्यांनी सदर अर्जात नमूद केले नाही. सबब सदरचा अर्ज खर्चासह नाकारण्याबाबत प्रतिवादी यांनी विनंती केली आहे.

५. वादीचा अर्ज, प्रतिवादींचे म्हणणे तसेच अभिलेखाचे अवलोकन केले. वादीने सदरचा दावा हा प्रतिवादी विरूध्द दावा मिळकतीचे सरसनिरस मानाने वाटपासाठी दाखल केलेला आहे. दाव्याचे कामकाज चालू असताना प्रतिवादी क्र.४ हया मयत झाल्या आहेत. तसेच वादीला प्रतिवादीचे वारसांविरुद्ध दावा चालविण्याचा अधिकार आहे. दाव्याचे स्वरुप विचारात घेता, तसेच दाव्याचा निकाल गुणदोषावर होण्याकरीता मयताचे वारसांना अभिलेखावर घेणेस झालेला विलंब माफ करणे योग्य होईल. करीता वादीवर र.रु.५००/- खर्च लादुन मंजुर करणे योग्य होईल. सबब खालील आदेश पारीत करीत आहे.

आ दे श

१. अर्ज खर्चासह मंजूर करण्यात येतो. खर्चाची रक्कम रुपये ५००/- वादीने प्रतिवादीस अदा करावी.

२. र.रु.५००/- वादीने प्रतिवादी यांना अदा केल्यानंतर वारस अभिलेखावर घेणेस झालेला विलंब माफ करणेत यावा.

ठिकाण - वाई. (एस. एस. कुलकर्णी)
दिनांक - १२.०७.२०२४ चौथे सह दिवाणी न्यायाधीश, क.स्तर वाई.